**<u>ठळक बातम्या</u>**

- छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती सर्वत्र उत्साहात साजरी; शिवनेरीवर मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत शासकीय सोहळा

- इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६ चं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते औपचारिक उद्घाटन, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या लोकशाहीकरणाची आवश्यकता केली व्यक्त

- पवित्र रमजान महिन्याला आजपासून सुरुवात

- महिला क्रिकेटमधे, ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या दुसऱ्या टी ट्वेंटी सामन्यात भारताचा पराभव

**आणि**

- अमेरिका आणि इराणमधल्या वाढत्या भू-राजकीय तणावामुळे भारतीय शेअर बाजारात मोठी घसरण

**<><><><><>**

छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती आज सर्वत्र उत्साहात साजरी होत असून महाराष्ट्रात ठिकठिकाणी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

राज्यातला मुख्य शासकीय सोहळा महाराजांचं जन्मस्थान असलेल्या किल्ले शिवनेरीवर मोठ्या थाटात संपन्न झाला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी किल्ल्यावरच्या शिवकुंजावर छत्रपती शिवाजी महाराज आणि राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारही या सोहळ्याला उपस्थित होत्या.

महाराजांनी उभारलेलं स्वराज्य हे अन्याय आणि दडपशाही मुक्त राज्य होतं आणि त्यात महिलांचा सन्मान, शेतकऱ्यांचं कल्याण आणि प्रत्येक जाती-धर्माच्या व्यक्तीला न्याय मिळत होता, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. महाराजांचं

जलव्यवस्थापन, करप्रणालीतली सुधारणा आणि नौदलाच्या उभारणीतली दूरदृष्टी, याचा मुख्यमंत्र्यांनी आपल्या भाषणात विशेष उल्लेख केला.

शिवजयंती हा 'आत्मभानाचा सण' असून महाराजांनी रयतेच्या मनात स्वाभिमानाचं स्फुल्लिंग चेतवलं, ज्यामुळे आजही सामाजिक वीण घट्ट आहे, असं ज्येष्ठ नेते **शरद पवार यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे**.

तर शिवराय मनामनात आणि शिवजयंती घराघरात साजरी करण्याचं आवाहन, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष **हर्षवर्धन सपकाळ यांनी** केलं आहे.

**<><><><><>**

कृत्रिम बुद्धिमत्तेचं लोकशाहीकरण होणं आवश्यक असून, विशेषतः ग्लोबल साऊथ साठी कृत्रिम बुद्धिमत्ता हे समावेशन आणि सक्षमतेचं साधन बनायला हवं असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत भारत मंडपम इथं इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६ चं औपचारिक उद्घाटन करताना बोलत होते. जगातली सर्वात मोठी तरुण लोकसंख्या, आणि सर्वात मोठ्या तंत्रज्ञान प्रतिभेचं केंद्र असलेल्या भारतात एआय, म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्तेवरच्या परिषदेचं आयोजन होत असून, ग्लोबल साऊथ मधल्या देशांसाठी ही अभिमानास्पद गोष्ट आहे, असं ते यावेळी म्हणाले.

- **- होल्ड बाईट मोदी - -**

कृत्रिम बुद्धिमत्ता हा मानवी इतिहासातला एक परिवर्तनकारी अध्याय असून, भारत केवळ एआय क्रांतीचा भाग नाही, तर त्याचं नेतृत्व करतो, आणि त्याला आकार देतो, असं प्रधानमंत्री म्हणाले. या परिषदेला जगभरातले नेते आणि उद्योग आघाडीच्या कंपन्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज नवी दिल्लीत सुरू असलेल्या इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६ च्या दरम्यान अनेक देशाच्या नेत्यांशी द्वीपक्षीय चर्चा केली.

अबुधाबीचे राजकुमार शेख खालिद बिन मोहम्मद बिन झायेद अल नाहयान यांच्याशी द्विपक्षीय चर्चा केली. यावेळी दोन्ही देशातल्या द्विपक्षीय सहकार्यावर चर्चा झाली तसंच विविध क्षेत्रात झालेल्या प्रगतीबद्दल दोन्ही नेत्यांनी समाधान व्यक्त केलं. यावेळी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात सहकार्य वाढवण्याबाबतही चर्चा झाली.

प्रधानमंत्री मोदी यांनी नेदरलँडचे प्रधानमंत्री डीक स्कूफ यांच्याशीही द्विपक्षीय चर्चा केली. आर्थिक आणि सामाजिक परिवर्तन घडवण्यासाठी एआय क्षेत्र सक्षम करण्याविषयी दोन्ही नेत्यांनी चर्चा केली. नवोन्मेष आणि तंत्रज्ञान क्षेत्रात सहकार्य दृढ करण्यासंबंधी दोन्ही नेत्यांनी सहमती दर्शवली.

प्रधानमंत्र्यांनी स्वित्झर्लंडचे राष्ट्राध्यक्ष गाय पार्मेलिन यांच्याशीही चर्चा केली. ग्रीसचे प्रधानमंत्री क्यारीकोस मिझोटाकिस यांच्याशी मोदी यांनी व्यापार, संरक्षण, सुरक्षा, पर्यटन, संस्कृती आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांसारख्या नव्या तंत्रज्ञानातल्या सहकार्यावर चर्चा केली.

**<><><><><>**

कानपूर इथल्या राष्ट्रीय कौशल्य प्रशिक्षण संस्थेत वैमानिकी आणि संरक्षण क्षेत्रातल्या कौशल्यासाठी राष्ट्रीय उत्कृष्टता केंद्र स्थापन करण्याची घोषणा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केली आहे. प्रधानमंत्री कौशल्य आणि रोजगार परिवर्तन योजनेअंतर्गत फ्रान्स सरकारच्या सहकार्यानं हे केंद्र स्थापन केलं जाईल. भारत-फ्रान्स नवोन्मेष वर्षाचं उद्घाटन करताना प्रधानमंत्र्यांनी फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्राँ यांच्यासोबत संयुक्त पत्रकार परिषदेत ही घोषणा केली.

**<><><><><>**

मुस्लिम समाजामध्ये पवित्र समजला जाणारा रमजानचा महिना आजपासून सुरू झाला. काल संध्याकाळी देशाच्या अनेक भागात चंद्रदर्शन झालं. रमजान हा इस्लामिक दिनदर्शिकेतला नववा महिना आहे. महिन्याच्या शेवटी ईद-उल-फित्र साजरी केली जाते.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमधे, ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर असलेल्या भारतीय संघाला आज कॅनबेरा इथं झालेल्या दुसऱ्या टी ट्वेंटी सामन्यात पराभव पत्करावा लागला. यजमान ऑस्ट्रेलियानं प्रथम फलंदाजी करताना ५ गडी गमावून १६३ धावा केल्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना भारताला ९ गडी गमावून १४४ धावाच करता आल्या.

**<><><><><>**

टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज कोलकता इथं झालेल्या सामन्यात वेस्ट इंडिजनं इटलीवर ४२ धावांनी विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना वेस्ट इंडिजनं ६ गड्यांच्या मोबदल्यात १६५ धावा केल्या. मात्र, इटलीचा संघ १८ षटकातच १२३ धावात गारद झाला.

कोलंबो इथं झालेल्या, दुसऱ्या सामन्यात झिम्बाब्वेनं श्रीलंकेवर ६ गडी राखून मात केली. प्रथम फलंदाजी करताना श्रीलंकेनं ७ गडी गमावून १७८ धावा केल्या होत्या. झिंबाब्वेनं हे लक्ष्य ४ गड्यांच्या मोबदल्यात ३ चेंडू बाकी असतानाच पार केलं.

आजचा तिसरा सामना चेन्नईत अफगाणिस्तान आणि कॅनडा यांच्यात सुरु आहे. कॅनडानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

अमेरिका आणि इराणमधल्या वाढत्या भू-राजकीय तणावामुळे निर्माण झालेल्या अस्थिरतेचे परिणाम आज भारतीय शेअर बाजारावर उमटले. खनिज तेलांच्या किमतीने आज उच्चांक गाठला. त्यामुळे गेले तीन दिवस तेजी नोंदवणाऱ्या भारतीय शेअर बाजारांमध्ये आज तीव्र घसरण पाहायला मिळाली. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे आज १ हजार २३६ अंकांची घसरण  झाली, आणि तो

८२ हजार ४९८ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ३६५ अंकांनी घसरुन २५ हजार ४५४ अंकांवर बंद झाला.

<><><><>

भारत आणि फ्रान्स हे दोन्ही देश राफेल विमानांबाबत सहकार्य वाढवायला इच्छुक फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्राँ यांनी म्हटलं आहे. नवी दिल्ली इथे झालेल्या इंडिया एआय इम्पॅक्ट समिटच्या निमित्ताने माध्यमांशी ते बोलत होते. काही दिवसांपूर्वी भारताने ११४ राफेल विमानांच्या नवीन तुकडीचं नेतृत्व करण्याची आणि त्यांच्या उत्पादन सहकार्य करण्याची तयारी दर्शवल्याचं मॅक्राँ म्हणाले.

<><><><>

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात फलोत्पादन सहकार्याविषयीच्या संयुक्त कृतीगटाची पहिली बैठक आज झाली. दोन देशात गेल्या वर्षीच्या मार्चमधे झालेल्या सहकार्य कराराच्या अंमलबजावणीच्या दिशेनं टाकलेलं हे आणखी एक पाऊल आहे. या बैठकीला भारतातर्फे कृषी आणि शेतकरी कल्याण विभागाचे फलोत्पादन सहसचिव प्रिय रंजन आणि न्यूझीलंडचे द्वीपक्षीय संबंध आणि व्यापार विषयक विभागीय व्यवस्थापक स्टीव्ह आएन्सवर्थ आभासी माध्यमातून उपस्थित होते.

<><><><>

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आज आंध्र प्रदेशातल्या विशाखापट्टणम इथं मिलन-२०२६ या बहुराष्ट्रीय नौदल सरावाचं उद्घाटन केलं. सहभागी देशांच्या नौदलांमध्ये एकत्र काम करण्याची क्षमता वाढवणं, अनुभव सांगणं आणि मैत्री दृढ करणं हा या सरावाचा उद्देश आहे. संयुक्त सराव आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे परस्पर विश्वास वाढेल आणि सामायिक आव्हानांचा एकत्रित सामना करता येईल असं राजनाथ सिंह म्हणाले. यंदा या सरावात ७४ देश सहभागी झाले आहेत.

<><><><>

सर्वोच्च न्यायालयाची पूर्व परवानगी घेतल्याशिवाय आपण देश सोडून जाणार नाही असं हमीपत्र उद्योजक अनिल अंबानी यांनी आज दाखल केलं. रिलायन्स कम्युनिकेशन्स लिमिटेडशी संबंधित मोठ्या बँक कर्जांच्या घोटाळा प्रकरणात सध्या सुरू असलेल्या चौकशीच्या पार्श्वभूमीवर अनिल अंबानी यांनी हे हमीपत्र दिलं आहे.

<><><><><>

राष्ट्रीय मानवाधिकार आयोगानं सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांचे मुख्य सचिव आणि पोलिस महासंचालकांना नोटीस बजावली असून, आयोगाच्या नावाचा गैरवापर करून जनतेची दिशाभूल करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचा शोध घ्यावा असे निर्देश त्यांना दिले आहेत.

//<><><><><>//